उप संचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ यांच्या अधिपत्याखालील जिल्हा रुग्णालय रत्नागिरी येथील ६३ अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः अपदे-२०१८/प्र.क्र.२०६/आरोग्य ३ (अ)

१० वा मजला संकुल इमारत
जी.टी.रुग्णालय आवार, मुंबई-४००००१
दिनांक: १६ एप्रिल,२०१९

वाचा:-

१) शासन निर्णय क्रमांकः अपदे-२०१८/प्र.क्र.२०६/आरोग्य ३ अ, दि.१५.११.२०१८

२) सह संचालक, आ.से.(रुग्णालये) राज्यस्तर मुंबई यांचे पत्र क्र. संआसे/कक्ष-३/टे-१२/कोल्हापूरमंडळकोल्हापूर/अपदेमुदवाढ/सन-२०१९-२०/५३४१-४२/१९, दि. ३.४.२०१९

३) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क.दि.२१.०२.२०१९

शासन निर्णय

संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये उप संचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ यांच्या अधिपत्याखालील जिल्हा रुग्णालय, रत्नागिरी येथील ६३ अस्थायी पदांना दिनांक १.१०.२०१८ ते दिनांक २८.२.२०१९ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आली होती. संदर्भाधीन क्र.२ येथील प्रस्तावास अनुसरुन सदर पदांना दिनांक १.३.२०१९ ते दिनांक ३०.९.२०१९ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्याची बाब विचाराधीन होती.

उप संचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ यांच्या अधिपत्याखालील जिल्हा रुग्णालय, रत्नागिरी येथील ६३ अस्थायी पदांना वित्त विभागच्या क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.२१.०२.२०१९ या शासन निर्णयान्वये दिनांक १.३.२०१९ ते दिनांक ३०.९.२०१९ या कालावधीपर्यत मुदतवाढ देण्यात येत आहे.

सदर पदांवरील खर्च पुढील प्रमाणे दर्शविण्यात आलेल्या लेखाशिर्षातून खर्ची टाकण्यात यावा आणि हा खर्च सन-२०१९-२० या वर्षाकरीता मंजूर झालेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

<u>मागणी क्रमांक आर-१</u>

२२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०६ नागरी आरोग्य सेवा व विषम चिकित्सा, ११०- रुग्णालये व दवाखाने, ११०-२ मुफसल क्षेत्रातील शासकीय रुग्णालये व दवाखाने, (०१ (०१) मुफसल क्षेत्राती अध्यापनेतर शासकीय रुग्णालये (२२१० ०१४६)

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय वित्त विभाग क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/ १६/आ.पु.क.,दि.२१.२.२०१९ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०४११११५७११५११७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pradip M Balkavde

Digitally signed by Pradip M Balkavde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8db6aab31faca2f1a89698a28c94703436c07cda664672d20607766dc59d345b, serialNumber=ed0fa40788bb5c0d7f76b869fa2e5835af215c6a80eae8f70eaf87b0cf68d63f, cn=Pradip M Balkavde
Date: 2019.04.16 15:45:56 +05'30'

(प्र.मो.बलकवडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
२. संचालक, आरोग्य सेवा, संचालनालय, मुंबई.
३. सहसंचालक, (रुग्णालये राज्यस्तर) आरोग्य सेवा,संचालनालय,मुंबई
४. उपसंचालक आरोग्य सेवा, मंडळ कोल्हापूर
५. जिल्हा शल्य चिकित्सक, रत्नागिरी
६. जिल्हा कोषागार अधिकारी, रत्नागिरी
७. महाराष्ट्र (लेखा व /लेखा परिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई
८. वित्त विभाग (व्यय १३)/ वित्तिय सुधारणा-१ मंत्रालय, मुंबई
९. अवर सचिव.(अर्थसंकल्प, सेवा-२ सेवा-३, सेवा-५,) सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१०.निवड नस्ती (आरोग्य-३ अ)